# उड्डाणपूल, केबल ब्रीज, डिलाईल पुलाचे काम मार्गी

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन

प्रतिनिधी

मुंबई, सोमवार - महापालिकेच्या महत्त्वाकांशी असलेल्या प्रकल्पांतील महालक्ष्मी येथील उड्डाणपूल, केबल ब्रीज, लोअर परळ डिलाईल पूल जोडरस्त्याच्या कामाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते नुकतेच भूमीपूजन करण्यात आले. तसेच मियावाकी गार्डन तसेच राणी बागेतील देशातील पहिलेच पक्षी विहार, प्राण्यांच्या अद्ययावत- नैसर्गिक दालनांचे लोकार्पण पार पडले. आता महापालिका आणि राज्य सरकारही आपलेच आहे, त्यामुळे मुंबईचा सर्वांगीण विकास होईल असा विश्वास यावेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिला.

सुविधांवर पडणारा ताण, वाहतूक कोंडी ही मुंबईची समस्या आहे. मात्र कोस्टल रोड, मेट्रो, नवे रस्ते तसेच पुलांमुळे ही समस्या दूर होणार आहे. मुंबईत जन्मलेला पहिला मुख्यमंत्री म्हणून मुंबईच्या समस्या पाहत आलो आहे. त्या आता प्राध्यान्याने सोडवायच्या आहेत. मुंबईच्या विकासासाठी असलेले पालिकेचे जे प्रकल्प असतील ते तातडीने सरकारकडे आणा, त्यांना तातडीने मंजुरी देऊन काम करू असेही ते म्हणाले. तसेच पालिकेचे महत्वाकांक्षी असलेल्या प्रकल्पांतील महालक्ष्मी रेल्वे स्थानकाजवळ डॉ. ई. मोझेस रोडवर होणारा उड्डाणपूल, केशवराव खाड्ये मार्गावर होणारा केंब्रीज आणि डिलाईल पुल या कामांचे भूमिपूजन करण्यात आले. यामुळे एल्फिन्स्टन, लोअर परळ आणि महालक्ष्मी परिसरातील वाहतूक कोंडी फुटण्यासही मदत होणार आहे. या कामांसाठी पालिका ८८४ कोटींचा खर्च करणार आहे. भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानातील देशातील पहिलेच मुक्त पक्षी विहार दालनाचेही अनावरण करण्यात आले. यावेळी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, महापौर किशोरी पेडणेकर, उपमहापौर अॅड. सुहास वाडकर, सभागृह नेत्या विशाखा राऊत, स्थायी समिती अध्यक्ष यशवंत जाधव, खासदार अरविंद सावंत, अनिल देसाई, राहुल शेवाळे आदी उपस्थित होते.

## मियावाकी गार्डन, पक्षीविहार दालनाचेही लोकार्पण



### बिबट्या, अस्वल, तरस, कोल्हा, कासव

राणीबागेतल्या पाण्यातील कासव, जमिनीवरील कासव, बिबट्या, अस्वल, तरस, कोल्हा यांच्यासाठीही दालन बनवण्यात आले आहे. विशेष म्हणजे नैसर्गिक अधिवासाप्रमाणे असणाऱ्या दालनात ठेवलेले पक्षी जवळून न्याहाळता यावेत यासाठी विशिष्ट प्रकारची काच बसवण्यात आली आहे. त्यामुळे पर्यटकांना प्राण्यांबरोबर सेल्फीही घेता येणार आहे.

### मियावाकी'मुळे प्रदूषण कमी होणार

वडाळा भक्ती पार्क येथे पालिकेने जापनीज पद्धतीचे मियावाकी गार्डन प्रकल्प पूर्ण झाला आहे. या वनीकरण मोहिमेत मुंबईत ६४ प्लॉटची निवड करण्यात आली असून या जागांवर ३ लाख ७७ हजार झाडे लावण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे मियावाकी वन' पद्धतीत सामान्य वृक्ष लागवडीपेक्षा ३० पट जास्त झाडांची लागवड करता येणार असून अवघ्या तीन वर्षांत ही वने मेंटेनन्स-फ्री होणार आहेत. अशा प्रकल्पांमुळे मुंबईतील प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे.

### मुक्त पक्षी विहार

४४ फूट उंच आणि १८ हजार २३४ चौरस फूट क्षेत्रफळात दालन तयार केले आहे. बजरीगर, क्रौंच, हॅरॉननाईट, पेलीकन करकोचा (स्टॉर्क), सारस, मकाव यासारख्या विविध १०० पक्ष्यांचा यात समावेश आहे. या ठिकाणी पक्षांसाठी झाडांवर विशिष्ट व्यवस्थेबरोबरच पक्ष्यांचा घरट्यांचीही काळजी घेण्यात आली आहे. याच विहारामध्ये १६ फूट उंचीवरून वाहणारा धबधबा आणि ओहोळही आहे. पर्यटकांना ९६ मीटर लांबीचा असलेल्या पादचारी पुलावरून विहारात फिरता येणार आहे. त्यामुळे पक्षी जवळून पाहण्याचा आनंद घेता येईल.



# राणी बागेतील नवे पाहुणे पाहण्यासाठी पर्यटकांची झुंबड

प्रतिनिधी

मुंबई, सोमवार - राणी बागेत दाखल झालेल्या पेंग्विननंतर आता बिबट्या, अस्वल, तरस, कासव, अजगर, नाग आणि १०० जातीय देशी- विदेशी पक्षांना पालिकेने आणले आहे. मुंबईकर- पर्यटकांनी त्यांना पाहण्यांसाठी मोठी गर्दी केली होती. रविवारी दिवसभरात सुमारे १५ हजार पर्यटकांनी भेटी दिल्या. पालिकेला यातून पाच लाखांचा महसूल मिळाला, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली.

भायखळ्याच्या वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणी संग्रहालयात मार्च २०१७ मध्ये पर्यावरण- पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांच्या संकल्पनेतून हंम्बोल्ट पेंग्वीन' आणल्यापासून याठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत हजारोंच्या संख्येने वाढ झाली आहे. यामुळे पालिकेच्या मासिक उत्पन्नही लाखोंनी वाढले आहे. दररोज १५ ते २० हजार मिळणारे उत्पन्न एक लाखांपासून तब्बल सहा लाखांवर गेले आहे. आता राणी बागेचे नूतनीकरण- आधुनूकीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे अस्वल, बिबट्या, तरस, कासव, अजगर, नाग आणि शंभर जातीय देशी विदेशी पक्षी आणण्यात आली आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते रविवारी नव्या पक्षी-प्राणी दालनांचे लोकार्पण करण्यात आले. या दिवशीच १४ हजार पर्यटकांनी राणी बागेला भेटी दिल्या. तसेच या नव्या प्राण्यांमुळे राणी बागेत पर्यटक- मुंबईकरांची गर्दी वाढू लागली असून सोमवारीदेखील पर्यटकांचा ओघ सुरूच होता.

### पालिकेलाही पाच लाखांचा महसूल

# पर्यावरण पूरक सौरऊर्जा निर्मितीवरील कर लादणारा प्रस्ताव तातडीने मागे घ्या

### आशिष शेलार यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

मुंबई, सोमवार (विशेष प्रतिनिधी) - दि. २७ जानेवारीएकीकडे पर्यावरण प्रेमाच्या शपथा घेणाऱ्या राज्य शासनाने प्रत्यक्षात मात्र पर्यावरण पुरक सौर ऊर्जेची स्वखर्चाने निर्मिती करणाऱ्या गृहनिर्माण सोसायट्यांना नवा वीज कर आकारण्याचे प्रस्तावित केले आहे. हा कर अन्यायकारक असून तातडीने हा प्रस्तावच मागे घ्या, अशी मागणी करणारे पत्र भाजपा नेते माजी शिक्षणमंत्री आमदार अॅड. आशिष शेलार यांनी आज मुख्यमंत्र्यांना लिहिले आहे. महाराष्ट्र शासनाच्या उर्जा विभागाने महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे केलेल्या याचिकेत स्वखर्चाने सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या हौसिंग सोसायटीच्यांना यापुढे प्रत्येक युनिट मागे ४.४६ ते ८.८६ रुपये कर आकारण्यात यावा असे प्रस्तावित केले आहे.

# शिवभोजन आता सीएसआर आणि कॉर्पोरेट फंडातून

## पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांची माहिती

प्रतिनिधी

मुंबई, सोमवार - राज्य शासनाच्या शिव भोजन योजनेला सबसिडी दिली जाते. आता सीएसआर आणि कॉर्पोरेट फंडातून शिव भोजन उपलब्ध करुन दिली जाईल, अशी माहिती पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी दिली. तसेच येत्या काळात भंगारात निघणाऱ्या एसटी आणि बेस्ट बसच्या माध्यमातून सेवा देणार असल्याचे ठाकरे म्हणाले.

मुंबई महापालिकेच्या भायखळा राणीबाग येथील नव्याने बांधण्यात आलेल्या प्राणी- पक्षांच्या पिंजऱ्यांचे लोकार्पण मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. यावेळी आदित्य ठाकरे पत्रकारांशी संवाद साधला.

ठाकरे पुढे म्हणाले की, पोटाला जात- पात, धर्म नसतो, असे माझे आजोबा बाळासाहेब ठाकरे सांगायचे. आर्थिक परिस्थिती किंवा जात- पात न बघता ज्याला भूक लागली त्याचे पोट भरता यावे, म्हणून १० रुपयात शिव भोजन योजना सुरु केली आहे. आतापर्यंत १५० ठिकाणी ही योजना सुरु झाली आहे. जिथे शक्य होईल त्या ठिकाणी ही योजना राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर १० रुपयात जेवण मिळावे यासाठी शासन सबसिडी देत आहे. ती पुढे कमी करून सीएसआर आणि कॉर्पोरेट फंडातून वापरून ही योजना प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहचविण्याचा उद्देश आहे, असे आदित्य यांनी म्हणाले.

### बसमध्ये शिव भोजन



तहसिलदार कार्यालये, रुग्णालय, पालिकेचे विभाग कार्यालये आदी ठिकाणी शिव भोजन योजना सुरु आहे. भविष्यात योजनेचा विस्तार केला जाणार आहे. त्यामुळे येत्या काळात भंगारात काढल्या जाणाऱ्या एसटी आणि बेस्टच्या बसमध्ये शिव भोजन योजना राबविण्यात येईल, असे आदित्य यांनी स्पष्ट केले.

# मुंबईतील २४ स्कायवॉकचे व्हीजेटीआय करणार स्ट्रक्चरल ऑडिट

प्रतिनिधी

मुंबई, सोमवार - मुंबईतील पूल दुर्घटनांनंतर धोकादायक पुलांच्या सर्वेक्षणासाठी महापालिकेने कंबर कसली आहे. या पार्श्वभूमीवर शहरासह उपनगरातील २४ स्कायवॉकचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा निर्णय घेतला आहे. व्हीजेटीआयला ऑडीटचे काम देण्यात येणार असून यावर १ कोटी २४ लाख रुपये प्रशासन खर्च करणार आहे.

अंधेरीतील गोखले पूल व त्यानंतर हिमालय पूल दुर्घटनेनंतर मुंबईतील धोकादायक पुलांचा प्रश्न ऐरणीवर आला. मुंबई महापालिकेने या दुर्घटनानंतर मुंबईतील सर्वच पुलांचे सर्वेक्षण केले. आता स्कायवॉककडे पालिकेने मोर्चा वळवला आहे. एमएमआरडीएने बांधलेले हे २४ स्कायवॉक असून २०१५ ला मुंबई महापालिकेला हस्तांतरीत केले होते. सध्या ते जीर्ण, नादुरुस्त झाले आहेत. २०१७ मध्ये त्यांचा कालावधीही संपला आहे. तरीही येथून मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. भविष्यात दुर्घटना घडू नये, यासाठी पालिकेने २४ स्कायवॉकचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई व्हिजेटीआय या संस्थेची यासाठी निवड केली आहे. तसेच सर्वेक्षणासाठी १ कोटी २४ लाख ७५ हजार रुपये खर्च करणार आहे. या संदर्भातील प्रस्ताव स्थायी समितीत मंजुरीसाठी आला आहे.

### सर्वेक्षणासाठी कोटीचा खर्च



# मुंबईतील निसर्ग, संस्कृती परंपरेचे जयपूरमध्ये प्रदर्शन

### महापालिकेने स्वीकारले प्रायोजकत्व

मुंबई, सोमवार(प्रतिनिधी) - वन्य जीव संरक्षण तसेच पर्यावरण संवर्धनाचे महत्व अधोरेखित करण्यासाठी राजस्थानमधील जयपूर येथे १९ ते २५ मार्च दरम्यान प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. या प्रदर्शनात मुंबईतील निसर्ग, संस्कृती - परंपरेचे दर्शन घडणार आहे. मुंबई महापालिकेने प्रदर्शनाचे प्रायोजकत्व स्वीकारले असून आकस्मित निधीतून सुमारे अडीच कोटी रुपये त्यावर खर्च करणार आहे.

जागतिक दर्जाचे संमेलन आणि प्रदर्शन येत्या १९ ते २६ मार्च या कालावधीत आयोजित केले आहे. वाईल्डरनेस फाऊंडेशन ग्लोबल या जागतिक संस्थेच्यावतीने हा कार्यक्रम होत आहे.

कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक मुंबई महापालिका तर सह प्रायोजक राजस्थान राज्य शासन असणार आहे. हे अकरावे वल्ड वाईल्डनेस काँग्रेस प्रदर्शन वन्यजीव संरक्षक या विषयावर आधारीत आहे. महापालिकेने हाती घेतलेल्या वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान आणि प्राणिसंग्रहालयातील आधुनिकीकरण प्रकल्पांतर्गत चौथ्या टप्प्यांमध्ये इंटरप्रिटेशन सेंटर इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर वन्यजीव संरक्षण, पर्यावरण या बाबींचे अधोरेखित करणारे हे भव्य दालन असेल.




शिवसेना शाखा क्र.१०४ च्या वतीने हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त ज्येष्ठ नागरिकांना मोफत ब्लँकेट वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून विभागप्रमुख-आमदार रमेश कोरगावकर तसेच उपविभागप्रमुख दिनेश जाधव , महिला उपविभागप्रमुख शीतल पालांडे, नंदिनी सावंत, सिताराम खांडेकर, नितीन सावंत इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन शाखाप्रमुख संजय दळवी यांनी केले होते.

# एसटीची बसस्थानके अत्याधुनिक करणार

## आराखडा सादर करण्याचे आदेश - परिवहनमंत्री अनिल परब

विशेष प्रतिनिधी

मुंबई, सोमवार - राज्यातील बस स्थानकांमधील स्वच्छता, बसण्याची व्यवस्था, स्वछतागृहे, पिण्याच्या पाण्याची सुविधा याकडे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने विशेष लक्ष देऊन प्रवाशांच्या सेवेसाठी कार्य करावे, सर्व सुविधांनी युक्त अशा अत्याधुनिक बसस्थानकांचे आराखडा सादर करण्याचे निर्देश परिवहन मंत्री अनिल परब यांनी दिले. मंत्रालयात बस स्थानकातील स्वच्छता आणि नवीन बसस्थानक उभारण्यासंदर्भात आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी अनिल परब बोलत होते. परब म्हणाले, राज्यातील बसस्थानके स्वच्छ, सुंदर, आकर्षक असली पाहिजे. बसस्थानकांची वेगळी ओळख आणि प्रवाशांना सर्व सुविधा उपलब्ध होतील असा सर्व सुविधांनी युक्त आराखडा तयार करावा. तो राज्यात सर्व बसस्थानकांमध्ये वापरता येईल. त्यामुळे बसस्थानकांमध्ये एकसारखेपणा येईल आणि सर्व बसस्थानकांमध्ये स्वच्छता, पिण्याचे पाणी, प्रवाशांच्या बसण्याची व्यवस्था, अधिकारी कर्मचाऱ्यांसाठीची व्यवस्था अशा सुविधा देता येतील. बसस्थानकांमधील स्वच्छते बद्दलच्या प्रवाशांच्या तक्रारी दूर कराव्यात. बसस्थानके सुस्थितीत ठेवावी. प्रवाशांना आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा बसस्थानकामध्ये उपलब्ध करुन दिल्या तर त्याचा फायदा महामंडळाला होईल आणि अधिक एसटीकडे वळतील. राज्यातील बसस्थानकांचा आढावा घेऊन ज्या बसस्थानकाची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे त्याची दुरुस्ती करुन स्वच्छता करावी, जेथे नवीन बसस्थानके उभी करावयाची आहेत त्यासाठी आराखडा तयार करुन बसस्थानकांची ठिकाणे निश्चित करावी. पहिल्या टप्प्यात त्र्यंबकेश्वर, नगर जिल्हातील कर्जत, दापोली या बसस्थानकांची काम तातडीने पूर्ण करावीत, असेही अनिल परब यांनी यावेळी सांगितले. यावेळी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे महाव्यवस्थापक (बांधकाम) राजेंद्र जावंजळ, मुख्य अभियंता (स्थापत्य) प्रशांत पोतदार तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.



REQUIRED BUILDING REDEVELOPMENT PROJECT CONSULTANT/ARCHITECT
Applications are invited from qualified government approved architect/Project Consultant with regard to the proposed Redevelopment of Society Building of
Venkateshwara Co-operative Housing Society
Station Road, Bhayander (West) - 401101
Details of the Scope of Work, Duties and Terms & Condition can be obtained from Society Office between 11.00 am to 1.30 pm from 28-01-2020 to 04-02-2020..
Last Date for Submission of Complete Application 09-02-2020 between 11 AM to 2 PM at Society Office.
Contact No. 7977872046, 9869354241

# मुंबईत 'कोरोना'चा चौथा संशयीत, रुग्णालयांसाठी पालिकेचा आराखडा

प्रतिनिधी

मुंबई, सोमवार - चीनमधील जिवघेण्या 'कोरोना' विषाणूचा मुंबईत शिरकाव वाढला आहे. शुक्रवारी तिघे संशयीत सापडल्यानंतर सोमवारी चौथा संशयीत आढळून आला. महापालिकेने खबरदारीचा उपाय म्हणून विमानतळावर तपासणी केंद्र आणि कस्तुरबा रुग्णालयांतील डॉक्टर- कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ केली आहे. तसेच आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास पालिकेच्या मोठ्या रुग्णालयात विशेष व्यवस्था आणि रुग्णालयीन आराखडा तयार केल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली.

चीन-हाँगकाँगसह काही देशात कोरोना व्हायरसने हाहाकार उडवला आहे. या व्हायरसच्या तीन संशयित रुग्णांना पालिकेच्या कस्तुरबा रुग्णालयात दाखल केले आहे. त्यांच्या रक्ताचे नमुने पुण्यातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरॉलॉजीमध्ये पाठवले असून तिन्ही रुग्णांचे नमुने निगेटिव्ह आले आहेत. सोमवारी ताडदेव येथील एका रुग्णाला कस्तुरबा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. या रुग्णाने नुकताच चीन आणि हाँगकाँग येथे प्रवास केला होता. या रुग्णांची प्रकृती सुधारली आहे. मात्र, राज्य सरकारच्या आदेशानंतरच घरी सोडण्यात येईल, अशी माहिती आरोग्य अधिकाऱ्याने दिली.

### कस्तुरबात खाटा वाढवल्या

कोरोना व्हायरसचे मुंबईत तीन रुग्ण आढळले. महापालिकेच्या कस्तुरबा रुग्णालयात ४ वॉर्ड आणि १६ खाटा राखीव ठेवल्या आहेत. आता चौथा रुग्ण आढळल्यावर पालिकेने खबरदारी म्हणून कस्तुरबा रुग्णालयात आणखी १० खाटा वाढवल्या आहेत. पालिकेच्या केईएम, शीव, नायर आणि कूपर'सह उपनगरातील पाच स्पेशालिटी रुग्णालयांमध्ये विशेष व्यवस्था केली असून आराखडा देखील तयार केला आहे. तसेच आवश्यकता भासल्यास मोठ्या खासगी रुग्णालयांचीही मदत घेण्यात येणार आहे.

### कॉल सेंटर

कोरोना व्हायरस बाबत केंद्रीय आरोग्य विभागाने कॉल सेंटर सुरु केले आहे. नागरिकांनी +९१-११-२३९७८०४६ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन केंद्रीय आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

### विमानतळावर तपासणी, कॉल सेंटर सुरू



चीनमधून भारतात परतलेल्या १५५ फ्लाईटमधील ३३ हजार ५५२ प्रवाशांची तपासणी विमानतळावर करण्यात आली आहे. केरळमध्ये सात, मुंबईत चार आणि बेंगळुरू आणि हैदराबाद येथे प्रत्येकी एक कोरोना' संशयीत रुग्ण आढळले असून विविध रुग्णालयात ते देखरेखीखाली असल्याचे केंद्रीय आरोग्य विभागाने कळविले आहे. आजच्या दिवसात १८ फ्लाईटमधील ४३५९ प्रवाशांची स्क्रिनिंग करण्यात आली आहे. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रवाशांची तपासणी करण्यात येत आहे. कोरोनो'च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रासह नवी दिल्ली, कोलकाता, चेन्नई, बेंगळुरू, हैदराबाद आणि कोची येथे केंद्रीय विशेष दक्षता पथक दाखल होत असल्याची माहिती केंद्रीय आरोग्यमंत्री हर्ष वर्धन यांनी दिली. विमानतळावर चीनमधून येणाऱ्या प्रवाशांची तपासणी करण्यासाठी पालिका आणि विमानतळ प्रशासनाच्या डॉक्टरांचे पथक तैनात असल्याचेही ते म्हणाले. महापौर किशोरी पेडणेकर यांनीदेखील कस्तुरबा रुग्णालयासह पालिकेच्या आरोग्य सुविधेचा आढावा घेऊन आवश्यक सतर्कतता बाळगण्याचे निर्देश दिले आहेत.

अभिजीत एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा. लि. समापनातील च्या मत्ता संपादित करण्याकरिता स्वारस्याच्या अभिव्यक्ती (ईओआय) साठी निमंत्रण
अभिजीत एमएडीसी नागपूर एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड
४ x ६१.५ एमडब्ल्यु पॉवर प्लांट नागपूर, महाराष्ट्र
(राखीव किंमत: २०० कोटी)
निमंत्रणाच्या बाबतीत रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार मात्र) च्या विना-परतावा शुल्कासह इच्छुक अर्जदार ईओआय सादर करू शकतात. ईओआयच्या तपशिलवार अटी आणि शर्तींसाठी http://vinodkothari.com/bankruptcy-code/amnepl/ येथे भेट द्या किंवा amneplliquidation@gmail.com येथे एक मेल पाठवा.
समापन/सीआयआरपी/सरफैसी अंतर्गत मत्तांच्या विक्रीत सिद्ध केलेला अनुभव असलेले सेबी नोंदणीकृत मर्चंट बँकर्स/ख्यातनाम वित्तीय सल्लागार सुद्धा परिसमापकांकडून प्रस्तावित विक्रीकरिता सक्षम अर्जदारांच्या स्वारस्याची अभियाचना करू शकतात.
आवश्यक विना-परतावा शुल्कासह ईओआय प्राप्त करण्याची अंतिम तारीख आहे ०३.०२.२०२० सं. ७.०० वा. पर्यंत.
विनोद कुमार कोठारी, परिसमापक
अभिजीत एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा. लि.- समापनातील
पत्ता: १००६-१००९, क्रिष्णा बिल्डिंग,
२२४ एजेसी बोस रोड, कोलकाता- ७०० ०१७
ईमेल: resolution@vinodkothari.com
नोंदणी क्र.: आयबीबीआय/आयपीए-००२/आयपी-एन०००१९/२०१६-१७/१००३३
दिनांक: २५.०१.२०२०
N-2804

epaper.freepressjournal.in